महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग

जिल्हा परिषद सातारा अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित गट क मधील पदे भरण्याबाबतचे

**शुध्दीपत्रक क्र. १ दिनांक:-०३/०९/२०२१**

जिल्हा परिषद सातारा यांच्या आस्थापनेवरील आरोग्य विभागाशी संबंधित गट-क संवर्गातील केवळ नव्याने समाविष्ट दिव्यांग प्रवर्गाचे आरक्षणामधील व नव्याने समाविष्ट समांतर आरक्षणामधील पदांसाठी अर्ज मागविण्याबाबत व माहे मार्च २०१९ मध्ये आरोग्य विभागाशी संबंधित पदाकरिता आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्याबाबत जाहीर प्रकटन व सविस्तर जाहिरात www.maharddzp.com व www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २६/०८/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले असून, याबाबतची संक्षिप्त जाहिरात दिनांक २६/०८/२०२१ च्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**१.जाहीर प्रकटनामधील सुधारणा**

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क्र.९९/आस्था-८ दिनांक ०१ सप्टेबर २०२१ अन्वये प्राप्त झालेल्या सुधारीत सूचना विचारात घेऊन, सातारा जिल्हा परिषदेकडून वरील दोन्ही संकेतस्थळावर विवरणपत्र अ नुसार प्रसिध्द केलेल्या जाहीर प्रकटनातील मुद्दा क्र. ८ याव्दारे रद्द करण्यात येत आहे.

**१.संक्षिप्त व सविस्तर जाहीरातीमधील सुधारणा**

माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमधील एक किंवा अधिक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रदद झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने ५ संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून परिक्षा देता येणार आहे. तथापि ५ संवर्गाच्या पदभरती संदर्भात घेण्यात येणा-या परिक्षेसाठीच्या प्रत्येक संवर्गाची प्रश्नपत्रिका सर्व जिल्हा परिषदांसाठी संवर्गनिहाय सामायिक राहणार आहे. त्यामुळे सन २०१९ च्या जाहिरातीनुसार ज्या उमेदवाराने एक किंवा एकापेक्षा अधिक संवर्गाच्या परिक्षेसाठी एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदेमधून अर्ज भरलेले आहेत त्या उमेदवारांचे सर्व ठिकाणी भरलेले अर्ज ग्राहय धरले जातील. अशा उमेदवारांबाबत त्याने प्रत्यक्ष एकाच जिल्हा परिषदे अंतर्गत आयोजित परिक्षेस उपस्थित राहून परिक्षा दिल्यानंतर सदर परिक्षेमध्ये त्याला प्राप्त होणा-या गुणांच्या आधारे त्यांने ज्या ज्या जिल्हा परिषदेतून सदर पद भरतीसाठी अर्ज भरला आहे त्या त्या जिल्हा परिषदांच्या सदर पदांकरिताच्या तयार होणा-या गुणवत्ता (प्रवर्गनिहाय) यादीमध्ये त्याचे नाव गुणवत्ता क्रमांकानुसार अंतर्भूत केले जाईल.

तसेच दिनांक २६/८/२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या संक्षिप्त व सविस्तर जाहिरातीमध्ये एका उमेदवाराला, एकाच जिल्हा परिषदेसाठी अर्ज सादर करता येईल किंवा एकाच जिल्हा परिषदेकडे परिक्षा देता येईल इत्यादी उल्लेख ज्या ज्या ठिकाणी आलेला आहे, त्याऐवजी नव्याने समाविष्ट दिव्यांग प्रवर्गाचे आरक्षणामधील व नव्याने समाविष्ट समांतर आरक्षणामधील पदांसाठी दिनांक २६/८/२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार परिक्षेला बसु इच्छिणा-या उमेदवारांना, ग्राम विकास विभागाच्या दि.२३/०७/२०१८ च्या शासन निर्णयानुसार एक किंवा एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदांमध्ये पदांसाठी अर्ज करता येईल. तसेच एका उमेदवाराला एक किंवा अनेक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा राहिल. परंतु, प्रत्येक पदासाठी त्याला स्वतंत्र परिक्षा शुल्क आकारले जाईल. तसेच, उमेदवाराने परिक्षेसाठी उपस्थित राहण्याकरिता जिल्हा परिषदेचा विकल्प देणे आवश्यक आहे. याबाबत, www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उमेदवारास प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. तसेच, सदर उमेदवारांबाबतही परिक्षा व गुणवत्ता यादीबाबतची कार्यपध्दती वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे राहील.

सदरचे शुध्दीपत्रक www.maharddzp.com व www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| सदस्य सचिव, निवड समिती<br>तथा जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद सातारा | सदस्य, निवड समिती<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद सातारा | अध्यक्ष, जिल्हा निवड समिती<br>तथा जिल्हाधिकारी<br>सातारा |